BDC LIBRARY
New Paper Clipping
A.Y. 2024-2025




नारळवाडी, ता. पाटण येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी अमरसिंह पाटणकर यांनी शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# परिसर स्वच्छतेबरोबरच मनाची स्वच्छता करा : अमरसिंह पाटणकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाटण :** 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा या संतांनी परिसर स्वच्छ करत समाजाची मने स्वच्छ केली म्हणूनच त्यांची प्रगती झाली. त्यासाठी सर्वांनी परिसर स्वच्छतेबरोबरच मनाची स्वच्छता केली पाहिजे, तरच आपली व देशाची, गावाची प्रगती होईल,' असे प्रतिपादन कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी केले.

नारळवाडी येथे बाळासाहेब देसाई कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संचालक संजीव चव्हाण, सरपंच दयानंद चव्हाण, उपसरपंच सीमा वायदंडे, राणी चव्हाण यांची उपस्थिती होती.

संचालक संजीव चव्हाण म्हणाले, 'या शिबिरातून विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये शिस्त, आरोग्याच्या संदर्भात जागृती, नेतृत्व विकास, कौशल्य, संवाद कौशल्य, संघटन कौशल्य आदी विविध गुणांचा विकास करण्याच्या अनुषंगाने हे विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीर अत्यंत मोलाचे ठरले आहे.'

कार्यक्रम अधिकारी प्रा .डॉ. जी.एस. पट्टेबहादूर यांनी सात दिवसांत केलेल्या कामांचा आढावा घेतला. नारळवाडी येथे केलेल्या परिसर स्वच्छता, नेत्र तपासणी शिबिर, मोफत आरोग्य तपासणी, महिला सबलीकरण अशा विविध उपक्रमांबद्दल माहिती दिली.

७
सात दिवसांत केलेल्या कामांचा आढावा.

कार्यक्रमाचे प्रा. बजरंग चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एल.जी. गणगे यांनी आभार मानले. प्रा. आर. के. शिर्के यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व सदस्य डॉ. बी. व्ही. जाधव, प्रा. एस. के. संकपाळ, प्रा. डॉ. कुंभार, प्रा. इ. यू. गव्हाणे, प्रा. व्ही. एस. कांबळे, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.